# शिंदेसेनेचे आता जिल्ह्यात तीन जिल्हाप्रमुख

## आनंदराव पवार,संजय विभूते, बजरंग पाटील यांच्याकडे जबाबदारी

**सांगली : हॅलो प्रभात**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आता जिल्ह्याला तीन जिल्हाप्रमुख दिले आहेत. आनंदराव पवार यांच्यासह आता संजय विभूते, बजरंग पाटील यांच्याकडे जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. भाजपमधून काँग्रेसमार्गे शिवसेनेत दाखल झालेल्या मोहन वनखंडे यांच्याकडे महानगर प्रमुख पदाची धुरा सोपवण्यात आली. जिल्ह्यात पक्षसंघटन विस्तारासाठी आमदार सुहास बाबर यांच्याकडेही संघटन प्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली. शिंदेंच्या शिवसेनेत सत्ता आणिपदांचे विकेंद्रीकरण केले जाईल, असे संकेत देण्यात आले होते. जिल्ह्यात आधी दोन जिल्हाप्रमुख होते. त्यात आणखी भर घालत तिघांवर जबाबदारी सोपवण्यात आली. आनंदराव पवार यांच्याकडे इस्लाम पूर, शिराळ्यासह पलूस-कडेगाव विधानसभा मतदार संघाची जबाबदारी असेल. संजय विभूते यांना खानापूर-आटपाडी, तासगाव-कवठेम हांकाळ आणि जत विधानसभा क्षेत्रासाठीचे जिल्हाप्रमुख पद देण्यात आले. बजरंग पाटील हे सांगली आणि मिरज विधानसभा मतदार संघाचे प्रमुख असतील.

त्यातही महापालिका क्षेत्रप्रमुख मोहन वनखंडे यांच्याकडे सोपवताना त्यांना कवलापूर, भोसे, मालगाव आणि म्हैसाळ जिल्हा परिषद गटाची जबाबदारी देण्यात आली. सांगली शहरप्रमुखपदी सचिन कांबळे, तर मिरज शहरप्रमुखपदी विनायक सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. विभूते, पाटील हे दोघेही ठाकरेंच्या शिवसेनेत असताना जिल्हाप्रमुख राहिले होते. त्यामुळे जुन्यांना संधी देण्याचे शिंदे यांचे धोरण दिसते आहे. जिल्ह्यात खानापूर आणि काही प्रमाणात इस्लामपूर वगळता पक्षाची बांधणी नाही. त्यासाठी आमदार सुहास बाबर यांनी व्यक्तिशः लक्ष घालावे, असे आदेश देतानाच त्यांच्याकडे जिल्हा संघटनप्रमुख पदाची धुरा सोपवण्यात आली. सह संपर्कप्रम ुख पदाची जबाबदारी ज्येष्ठ नेते रा- वसाहेब घेवारे यांच्याकडे असून जिल्हा संघटकपदी गौरव नायकवडी, उपप्रम ुखपदी प्रदीप माने, जिल्हा सहसंघटन प्रमुख पदी महेंद्र चंडाळे यांची नेमणूक करण्यात आली.



# स्थानिक स्वराज्य च्या निवडणुका ताकदीने लढविणार

## रणधीर नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

शिराळा विधानसभा म तदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने लढवणार असून सत्ता काबीज करू असा विश्वास रणधीर नाईक यांनी व्यक्त केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी शिर-ाळा नगरपंचायत व शिराळा विधानसभा मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती गनातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मते जाणून घेण्यासाठी बोलवलेल्या बैठकीमध्ये ते बोलत हो-ते. यावेळी वाळवा मंडल चे राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष सी एच पाटील, शिराळा तालुका अध्यक्ष आनंदराव पाटील, वाळवा मंडलचे युवक अध्यक्ष अंकुश पाटील, शिराळा तालुक्याचे युवकचे अध्यक्ष प्रमोद पाटील, शिराळा विधानसभा प्रमुख रघ-ुनाथ पाटील, वाळवा मंडलच्या महिला अध्यक्ष सविता पाटील व शिराळा तालुक्याच्या महिला अध्यक्ष सीमा कदम यांची प्रम ुख उपस्थिती होती.

यावेळी वसंत पाटील,एन डी लोहार, हमीद नायकवडी, सुरेश पाटील,के वाय भास्टे, पांडुरंग गायकवाड, गजानन पाटील, बाजीराव सपकाळ, विनोद पन्हाळकर, स्वप्निल पाटील, दत्ताजी आंधळकर, शंकर नाकील, बबन पाटील,सागर नाईक, विजय पाटील, प्रा.भीम राव गराडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंचगंगा नदी घाट विकसितसाठी २ कोटी मंजूर

## आ. राहुल आवाडे यांच्या प्रयत्नांना यश

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील पंचगंगा नदी घाट विकसित करण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत आमदार राहुल आवाडे यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाने २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. प्राप्त निधीतून पंचगंगा नदी घाटाचा विकास होण्यासह तेथील ऐतिहासिक वास्तूंचे जतन होणार आहे.



इचलकरंजी शहरालगतच असलेली व शहराची वरदायीनी असलेल्या पंचगंगा नदीवरील घाट हा संस्थान काळात बांधण्यात आलेला आहे. या घाट परिसरात पुरातन महादेव मंदिर, इचलकरंजीचे जहागिरदार श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे सरकार यांची समाधी, वरद विनायक मंदिर, श्री रेणुका माता मंदिर तसेच सुर्य मंदिर आहे. त्यामुळे याठिकाणी विविध कार्यक्रम व उत्सवामुळे भाविक आणि नागरिकांची सतत वर्दळ असते. इचलकरंजी शहरात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पंचगंगा नदी घाट हा एक मात्र परिसर आहे. सतत भेडसावणाऱ्या पुरामुळेही घाट परिसराची काही प्रमाणात हानी झाली आहे. त्यामुळे या पंचगंगा नदी घाट परिसराचा विकास करणे आवश्यक आहे. या परिसराच्या विकासामुळे नागरिकांना विरंगुळा ठिकाण होण्यासह येथे असलेल्या पुरातन व ऐतिहासिक वास्तूंचे जतन होणार आहे. त्याचबरोबर येणाऱ्या पिढीला या ऐतिहासिक वास्तूंची माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पंचगंगा नदी घाट विकसित करणे कामासाठी पर्यटन विभाग अंतर्गत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी आमदार राहुल आवाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्या अनुषंगाने राज्य शास-नाने प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे लवकरच पंचगंगा नदी घाटाचे रुपडे पालटणार आहे.

# ऊसासाठी साखर कारखान्यांची चढाओढ!

## तालुक्यात शेतकऱ्यांचा कल जादा दर देणाऱ्या कारखान्याकडे

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

कडेगाव तालुक्यात सध्या उसाच्या गाळप हंगामाची जोरदार तयारी सुरू असून, शेतकऱ्यांनी आपल्याच कारखान्याला ऊस द्यावा यासाठी साखर कारखान्यांमध्ये चुरशीची स्पर्धा सुरू झाली आहे. डॉ. पतंगराव कदम सोनहिरा साखर कारखाना, ग्रीन पॉवर शुगर्स, क्रांती सहकारी साखर कारखाना आणि कृष्णा सहकारी साखर कारखाना हे चारही कारखाने ऊसासाठी मोहीम राबवत आहेत. प्रत्येक कारखाना आपापल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी जादा पहिला हप्ता आणि इतर प्रोत्साहन देत आहे. काही कारखाने वाहतूक व कापणीवरील सवलतींचे



आमिष दाखवत आहेत, तर काही कारखाने बोनसच्या आश्वासनावर ऊस आणण्यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधत आहेत.

दरवर्षीप्रमाणे या हंगामातही शेतकऱ्यांचा कल जास्त दर देणाऱ्या कारखान्याकडे झुकत आहे. ऊस दरासोबतच वेळेवर हप्ता देणाऱ्या कारखान्यांना शेतकऱ्यांची पसंती मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, तालुक्यातील ऊस गाळप हंगाम नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे. ऊस तोडणी कामगारांची कमतरता, मजुरी दरातील वाढ आणि वाहतूक खर्च हे मुद्दे यंदाही शेतकऱ्यांसमोर आव्हान म्हणून उभे आहेत.

ज्या कारखान्याकडून किमान ₹४,००० पहिला हप्ता आणि ₹५,००० चा अंतिम दर मिळेल, तिथेच ऊस द्यायचा अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे त्यामुळे या हंगामात ऊस दरावरूनच कारखान्यांची खरी चढाओढ ठरणार आहे.



# श्रीनिधी भोसले ची बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कुपवाड : हॅलो प्रभात**

सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या मार्फत दि.२७ व २८ ऑक्टोबर २०२५ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा येथे शालेय विभागीय स्तरीय बुद्धिबळ स्पर्धा १४, १७ व १९ वर्षाखालील वयोगटांमध्ये उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यम ची विद्यार्थिनी श्रीनिधी भोसले हिने १४ वर्षाखालील वयोगटात पाचवा क्रमांक मिळवून राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्रता मि ळवली आहे.

श्रीनिधीचे बुद्धिबळातील सातत्य, प्रचंड मेहनत आणि एकाग्रता ह्यांच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे. तिची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा ही दिनांक १२ ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सातारा येथे पार पडणार आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

या यशामागे सुरज फाउंडेशनचे अध्यक्ष प्रवीण लुंकड,डायरेक्टर संगीता पागनीस, उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, स्पोर्ट्स इनचार्ज विनायक जोशी,क्रीडाशिक्षक सुशांत सूर्यवंशी, बुद्धिबळ प्रशिक्षक अरुणा कुलकर्णी तसेच तिचे आई-वडील यांचे प्रोत्साहन लाभले आहे.

# वैष्णवी पाटील यांचा सत्कार संपन्न

**कोतोली : हॅलो प्रभात**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या डीवायएसपी वैष्णवी पाटील यांनी नव्या पदभाराचा स्वीकार केल्याबद्दल ज्ञानज्योती स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका, कोतोली यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ.संजय पाटील, योगेश्वर पाटील, सोनदेव बेलेकर



(कळे), शुभम भोसले, नयन पोवार, सौरभ मस्कर व शैलेश मस्कर उपस्थित होते.

यावेळी वैष्णवी पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास महत्त्वाचा असल्याचे सांगितले. यावेळी संस्थेच्या वतीने त्यांना विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली.

# 'डांगे' महाविद्यालयाच्या बास्केटबॉल संघाची कामगिरी

**आष्टा : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठांतर्गत सांगली विभागीय पुरुष बास्केटबॉल स्पर्धा नुकत्याच मि रज येथे पार पडल्या. या स्पर्धेत आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या पुरुष बास्केटबॉल संघाने उल्लेखनीय खेळ करत तृतीय क्रमांक पटकावला. या यशामुळे संघाची निवड आता पेठ वडगाव येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी झाली असून, कॉलेजच्या खेळाडूंनी घवघ-वीत यश मिळवत संस्थेचा गौरव वाढवला आहे. संघातील खे-ळाडू हर्षवर्धन पाटील, जगन्नाथ सूर्यवंशी,व्यंकटेश शिंदे, शंतनु



इंगळे, शिवराज पाटील, गीतिक कौल, आर्यन पवार, समरजित सावंत, वेदांत गायकवाड, ऋषिकेश पवार, आकाश शिंदे आणि पार्थ पाटील यांनी उत्कृष्ट खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ. अण्णासा-हेब डांगे, सचिव ॲड. राजेंद्र डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे, संचालक डॉ.एल.वाय. वाघमोडे, तसेच डीन डॉ. शैलेंद्र हिवरेकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघाच्या यशामागे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. रुद्रेश शिवपुलजी आणि प्रा. सैफअली नदाफ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडा : जिल्हाधिकारी काकडे

**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महा-TET) २०२५ च्या सुरळीत आयोजनासाठी सर्व संबंधित विभागांनी आवश्यक जबाबदारी घ्यावी. परीक्षा काम काजात कोणतीही दिरंगाई होऊ नये, नियोजनात्मक अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. ही परीक्षा पारदर्शक पध्दतीने पार पाडावी. कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विद्यार्थी, पालकांनी विश्वास ठेऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महा-TET) २०२५ च्या संचालनाबाबत जिल्हा सनियंत्रण समि तीची बैठक जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस डाएट प्राचार्य विकास सलगर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजे-साहेब लोंढे, शिक्षणाधिकारी (योजना) महेश धोत्रे, उपशिक्षणाधिकारी नागेश ठोंबरे, जोतिराम पाटील, प्रकाश खेडकर, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी



तसेच सर्व केंद्र संचालक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, परीक्षा कालावधीत गोपनियता आणि सुरक्षेची काळजी घेण्यात येत आहे. केंद्रावर सी.सी.टी.व्ही., सुरक्षा रक्षक आणि पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. परीक्षा केंद्रावर म ोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वायफाय सिंग्नल, जॅमर इत्यादी उपकरणांना मनाई असेल. परीक्षा केंद्रावर सर्व भौतिक सुविधा, मनुष्यबळाची नियुक्ती, स्वच्छतागृह इत्यादी अद्ययावत असावे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सोयीस्कर व्यवस्था असावी. केंद्रसंचालक व पर्यवेक्षक यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करून त्यामध्ये वरिष्ठ अधिकारी उपस्थित ठेवावेत. परीक्षा झाल्यानंतर परीक्षा साहित्य जिल्हास्तरावर काळजीपूर्वक जमा करावे, असा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# हुपरी शहरात राष्ट्रवादी (अ.प.गट) स्वबळावर लढणार

**हुपरी : हॅलो प्रभात**

हुपरी शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजगुरुनगर येथील जिव्हेश्वर भवनमध्ये कार्यकर्त्यांची आढावा बैठक व इच्छुक उमेदवारांच्या गाठीभेटी शहराध्यक्ष अभिजीत देसाई यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात पार पडली. या आढावा बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील (आसुर्लेकर) यांनी हुपरी नगर परिषदेच्या निवडणुकीदरम्यान आम्ही स्वबळावरती निवडणूक लढणार आहोत व प्रत्येक वार्डामध्ये आमचा उमेदवार



देऊन विजय करून त्यांना सत्तेमध्ये आणणार आहोत असे घोषित केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून वेगवेगळ्या असलेल्या शासकीय योजना, बचत गट योजना, शेतकरी योजना, अशा अनेक योजना पोहोचवणार असून प्रत्येक नागरिकाच्या अडचणी सोबत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्ष हा खंबीरपणे उभा राहील व त्या अडचणीतून त्यांना सोडवेल असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिरीष देसाई, संभाजी पवार, हर्षवर्धन चव्हाण, अभिजीत देसाई, वैशालीताई कंगणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षास बळ देण्याचे एक निश्चय करून निवडणूक लढवणार असल्याचे घोषित केले.

यावेळी कोल्हापूर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील (आसुर्लेकर), तालुकाध्यक्ष -शिरिष देसाई, हातकणंगले विधानसभा अध्यक्ष- संभाजी पवार, कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष -हर्षवर्धन चव्हाण, शहराध्यक्ष- अभिजीत देसाई, युवा तालुकाध्यक्ष- आकाश कांबळे, हुपरी महिला शहराध्यक्षा- वैशालीताई कंगणे, काळे सर,सतीश तानवडे, दिलावर तांबोळी, राजु माणकापूरे, अल्ताफ मुल्लानी, आधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थितीत होते.